# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.07.2026** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज राजस्थान आणि गुजरातच्या दौऱ्यावर; जोधपुर विमानतळावरच्या नवीन टर्मिनलचं लोकार्पण
2. भारत 1 लाख कोटी अमेरिकन डॉलर्सच्या निर्यातीचं उद्दिष्ट साध्य करण्याच्या मार्गावर- केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांचं प्रतिपादन
3. गुजरातच्या दहशतवाद विरोधी पथकाकडून, 'जैश-ए-महम्मद' संघटनेशी संबंध असलेल्या आठ जणांना अटक आणि
4. भारत आणि इंग्लंड यांच्या पुरुष क्रिकेट संघादरम्यानचा दुसरा टी-20 आंतरराष्ट्रीय सामना आज मँचेस्टर मध्ये रंगणार

**<u>पंतप्रधान राजस्थान-गुजरात दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज राजस्थान आणि गुजरातच्या दौऱ्यावर जात आहेत. राजस्थान मधील जोधपुर विमानतळावर उभारण्यात आलेल्या नवीन टर्मिनलचं लोकार्पण त्यांच्या हस्ते करण्यात येईल. या टर्मिनलसाठी 480 कोटी रुपये खर्च आला असून, वार्षिक 20 लाख प्रवासी हातळण्याची क्षमता आहे. जोधपुरमधील उडान योजनेचं अनावरणही त्यांच्या हस्ते होणार असून, त्यानंतर बलोत्रा इथे त्यांच्या हस्ते सुमारे 1 लाख कोटींहून अधिक विकासकामांची पायाभरणी आणि लोकार्पण त्यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर संध्याकाळी पंतप्रधान गुजरातमध्ये साणंदला जाऊन, तिथे उभारण्यात आलेल्या 'सीजी सेमी' च्या 'आउटसोर्स्ड सेमीकंडक्टर असेंब्ली अँड टेस्ट' सुविधेचं उद्घाटन करतील. भारताच्या सेमीकंडक्टर निर्मितीच्या प्रवासातील हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. 'इंडिया सेमीकंडक्टर अभियाना' अंतर्गत मंजूर झालेल्या पहिल्या चार प्रकल्पांपैकी हा एक प्रकल्प आहे.

**<u>पंतप्रधान-परदेश दौरा</u>**

6 जुलै ते 11 जुलै दरम्यान पंतप्रधान इंडोनेशिया प्रजासत्ताक, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या देशांच्या राष्ट्राध्यक्षांच्या निमंत्रणवरून पंतप्रधान या देशांना भेट देणार आहेत. गेल्या चार दशकांमध्ये भारतीय पंतप्रधानांचा न्यूझीलंडचा हा पहिलाच शासकीय दौरा असेल.

**<u>सितरामन-फ्रांस</u>**

फ्रांसच्या दौऱ्यावर असलेल्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन आणि फ्रान्सचे अर्थमंत्री रॅलॉ ल स्क्यूर यांच्यासह भारत-फ्रांस आर्थिक आणि वित्तीय परिषदेचं अध्यक्षपद भूषवलं. भारतातील आर्थिक विकासासाठी फ्रेंच विकास महामंडळाने केलेल्या कार्याची उभय नेत्यांनी प्रशंसा केली.

**<u>गोयल-व्यापार बैठक</u>**

भारत 1 लाख कोटी अमेरिकन डॉलर्सच्या निर्यातीचं उद्दिष्ट साध्य करण्याच्या मार्गावर आहे, असं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल नवी दिल्ली इथं 'बोर्ड ऑफ ट्रेड'च्या बैठकीत सांगितलं. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी वस्तूंची निर्यात सुमारे 440 अब्ज अमेरिकन डॉलर्सवरून 530 अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढवावी लागेल, तर सेवांची निर्यात साधारणपणे 421 अब्ज अमेरिकन डॉलर्सवरून 470 अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढवावी लागेल, असंही त्यांनी सांगितलं. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतच वार्षिक निर्यातीपैकी जवळपास 15 टक्के निर्यात नोंदवली गेली आहे. तर, आयातशुल्क रचनेतील बदल, मालवाहतुकीतील अडथळे आणि जागतिक मागणीत मंदी असूनही, भारतानं 2025-26 या आर्थिक वर्षात 863 अब्ज अमेरिकन डॉलर्सची आतापर्यंतची सर्वाधिक निर्यात करून 4 पूर्णांक 6 टक्के वाढ नोंदवली असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

यावेळी त्यांनी निर्यातवाढीला गती देण्यासाठी राज्यं, निर्यात प्रोत्साहन परिषद, उद्योग संघटना आणि निर्यातदार यांच्यासाठी सात-सूत्री कृती आराखडा मांडला.

**एल निनो-अमित शाह**

देशातील काही भागांमध्ये 'एल निनो'मुळे झालेल्या अपुऱ्या पावसामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा आणि त्याच्या परिणामांचा केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह आणि केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल संयुक्त आढावा घेतला. या बैठकीला केंद्रीय गृहसचिव आणि केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण सचिवांसह इतर विविध मंत्रालयांचे आणि विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांना सध्याच्या परिस्थितीत कोणत्या पिकांची पेरणी करावी, याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी राज्य सरकारांशी योग्य समन्वय साधण्याच्या सूचना शाह यांनी यावेळी केल्या. तसंच, जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना देशातील सर्व जलाशयांच्या पाणीपातळीवर सतत देखरेख ठेवण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

**खोमेनि अन्त्यसंस्कार**

इराणचे सर्वोच्च नेते दिवंगत अयातुल्लाह सय्यद अली खोमेनी यांचा अंत्यसंस्काराच्या सहा दिवसांच्या कार्यक्रमाला आजपासून सुरुवात होत आहे. यासाठी भारताचे प्रतिनिधि म्हणून बिहारचे राज्यपाल लेफ्टनंट जनरल सय्यद अता हसनैन आणि परराष्ट्र राज्यमंत्री पबीत्रा मार्गारिटा उपस्थित राहणार आहेत. भारत सरकार आणि जनतेच्या वतीने आम्ही खोमेनी यांना आदरांजली वाहिली तसंच, अलीकडील संघर्षात प्राण गमावलेल्यांच्या कुटुंबीयांप्रती त्यांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या, असं मार्गारिटा यांनी समाज माध्यमांवरील संदेशांत म्हटलं आहे.

**भेसळयुक्त दूधदंड**

भेसळयुक्त दूधनिर्मिती ते विक्री, वितरण करणाऱ्यांना 10 लाख रुपयांपर्यंत दंड करण्याचा इशारा महाराष्ट्राच्या अन्न आणि औषध प्रशासनानं दिला आहे. काही हॉटेल आणि उपाहार चालकांनी कीड नियंत्रणांची खोटी प्रमाणपत्रं सादर केल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यांचा परवाना रद्द करण्याचा इशारा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला.

**इथेनॉल**

20 टक्के इथेनॉल आणि 80 टक्के पेट्रोलचे मिश्रण असलेल्या ई-20 इंधनामुळे वाहनांच्या चलनक्षमतेत घट होत असल्याबाबत समाजमाध्यमांवर फिरणारे संदेश दिशाभूल करणारे आहेत असं स्पष्टीकरण सरकारतर्फे देण्यात आलं आहे. ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया', 'इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड', डेहराडून येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोलियम' आणि 'सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स' यांच्या सहकार्याने घेतलेल्या व्यापक क्षेत्रीय चाचण्यांनुसार, या इंधनाच्या वापरामुळे वाहनांच्या इंधन कार्यक्षमतेवर कोणताही लक्षणीय नकारात्मक परिणाम दिसून आलेला नाही. चारचाकी वाहनांच्या 40 हजार किलोमीटर आणि दुचाकी वाहनांच्या 20 हजार किलोमीटर अंतरावर या चाचण्या घेण्यात आल्या.

**आयुर्वेदिक विज्ञान**

आयुर्वेदिक विज्ञान संशोधन केंद्रीय परिषदेच्या, कार्यकारी समितीच्या काल नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत आयुर्वेद शिक्षण, संशोधन, वैज्ञानिक संवाद आणि डिजिटल प्रशासन यांना चालना देण्याच्या उद्देशानं तीन प्रमुख उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**गुजरात-एटीएस**

गुजरातच्या दहशतवाद विरोधी पथकाने, पाकिस्तानस्थित आणि बंदी घालण्यात आलेल्या 'जैश-ए-महम्मद' या दहशतवादी संघटनेशी संबंध असलेल्या आठ जणांना अटक केली. गुजरात आणि मध्य प्रदेशात एकाच वेळी राबवण्यात आलेल्या मोहिमेदरम्यान ही अटक करण्यात आली. गुजरात ए टी एस च्या सूत्रांनुसार, अटक करण्यात आलेले आरोपी, गुजरात मध्ये दहशतवादी कारवाया करण्यासाठी पाकिस्तानातील दहशतवादी सुत्रांशी संपर्कात होते. या मोहिमेदरम्यान, आरोपींकडून

आक्षेपार्ह वस्तु जप्त करण्यात आल्या तसंच पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटनेशी त्यांचे आर्थिक संबंध असल्याचे आढळून आले. अटक करण्यात आलेल्या आरोपींना 14 दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

**<u>फिफा विश्वचषक</u>**

फिफा विश्वचषकाच्या, अमेरिकेतील मियामी गार्डन्स इथं सुरू असलेल्या 'राऊंड ऑफ 32' मध्ये चुरशीच्या सामन्यात अर्जेंटिनाने काबो वर्दे संघाचा 3-2 असा पराभव करत 'राउंड ऑफ 16' मध्ये प्रवेश केला. अर्जेंटिनाचा आघाडीचा खेळाडू लिओनेल मेस्सीनं या स्पर्धेतील आपला सातवा आणि सहा स्पर्धांमधील 30 व्या सामन्यातला 20 वा गोल नोंदवला. या आधीच्या एका इथं झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा पेनल्टी शूटआउटमध्ये 4-2 असा पराभव करून इजिप्तनं 'राऊंड ऑफ 16' मध्ये प्रवेश केला. 92 वर्षांच्या इतिहासात विश्वचषकाच्या बाद फेरीत आपला पहिला विजय नोंदवत इजिप्तनं इतिहास रचला.

**<u>पुरुष टी-20 क्रिकेट</u>**

भारत आणि इंग्लंड यांच्या पुरुष क्रिकेट संघातील दुसरा टी-20 आंतरराष्ट्रीय सामना आज मँचेस्टर इथं होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार आज संध्याकाळी 7 वाजता सुरू होईल. पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द करण्यात आला होता.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागाने आज गुजरात, कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, पश्चिम मध्य प्रदेश आणि ओडिशा या भागांसाठी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा, तसंच काही ठिकाणी अत्यंत मुसळधार पावसाचा 'रेड अलर्ट' जारी केला आहे. पुढील दोन दिवसांत पूर्व राजस्थान, पूर्व मध्य प्रदेश, कर्नाटक किनारपट्टी, तेलंगणा आणि विदर्भात मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे.

दरम्यान, महाराष्ट्राच्या बहुतांश भागात काल सकाळपासून दमदार पावसानं हजेरी लावली. या पावसामुळं अनेक ठिकाणी नाले-बंधारे भरून वाहू लागल्यामुळं तसंच काही ठिकाणी दरडी कोसळल्यानं वाहतूक आणि जनजीवन विस्कळित झालं. या पावसामुळं राज्याच्या अनेक भागात नद्यांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. आजही मुसळधार पावसाचा अंदाज असल्याने पालघर, ठाणे यासह काही जिल्ह्यांमध्ये आज शाळा आणि महाविद्यालयांना सुटी जाहीर करण्यात आली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.